# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती
## (शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परिसर) अमरावती -४४४ ६०४.

Web: www.jdheamravati.org.in Email-jdheamt@yahoo.com

☎ क्रमांक -०७२१-२५३१२३५ फॅक्स क्र. ०७२१- २५३१४५७


जावक क्रमांक- ससं/उशि/ /२०२५ दिनांक - १३ /०३ /२०२५

**परिपत्रक**

विषय - प्रकरणाशी संबंधित नसलेल्या व्यक्ती (त्रयस्थ व्यक्ती) अथवा तत्संबंधितांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी/अर्ज/निवेदनाबाबत.

संदर्भ - उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आस्था-२०२५/ई ९१४६९५/ विशि - १/ दिनांक १८ फेब्रुवारी, २०२५.

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, दिनांक ३ डिसेंबर, १९५८ ची अधिसूचना आणि दिनांक १४ ऑक्टोबर, २०१९ च्या परिपत्रकान्वये त्रयस्थ व्यक्तीकडून प्राप्त तक्रारींवर करावयाच्या कार्यवाहीची कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. सदर कार्यपद्धती/तरतुदी विचारात घेऊन, तसेच शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेले विविध न्यायालयीन आदेश विचारात घेता, प्रकरणाशी संबंधित नसलेल्या व्यक्ती (त्रयस्थ व्यक्ती) अथवा तत्संबंधितांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी/अर्ज/निवेदने अथवा धमकी विचारात घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश संदर्भिय शासन निर्णयान्वये शासनाने दिलेले आहेत. विशेषत: अशा प्रकरणी कार्यवाही करताना ती कोणत्याही न्यायालयीन निर्णयाशी विसंगत होणार नाही, याची दक्षता सर्वांनी घ्यावी.

संदर्भिय शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

**(डॉ. केशव तुपे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
अमरावती विभाग, अमरावती

प्रति,

१. **कुलसचिव,**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

२. **प्राचार्य/संचालक,**
शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य/ विधी शिक्षणशास्त्र महाविद्यालये/संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.